नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 18/01/2022 (मंगळवार)
(दुपार)

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. रामटेक :– दिनांक 27/03/2019 चे 21.52 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मोहम्मद आमिर खान वल्द अहेमदखान वय 32 वर्षे रा. शितलवाडी रामटेक यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. 230/2019 कलम 353, 186 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 27/03/2019 चे 17.00 वा. दरम्यान फिर्यादी हे पटवारी असुन ते काम आटोपुन सोनेघाट ते रामटेक येथुन परत येत असतांना यातील आरोपी नामे– नाना उर्फ ज्ञानेश्वर नामदेव उईके, वय 30 वर्ष, रा. सोनेघाट, ता. रामटेक, जि. नागपूर हा अवैधरित्या रेती वाहतुक करीत असतांना मिळुन आला. यातील फिर्यादी हे कायदेशिर कार्यवाही करीत असतांना आरोपीने शासकीय कामात अडथळा करून धमकी दिली. आरोपीला दिनांक 25/02/2020 चे 13.16 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. मिलींद सरकटे व मसपोनि निषा भुते पो.स्टे. रामटेक यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 18/01/2022 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती. सी. पी. जैन, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 353 भादंवि. मध्ये कोर्ट उठे पर्यंत शिक्षा व 35,000/–रु. दंड व दंड न भरल्यास प्रत्येकी 2 महिने साधा कारावास, कलम 186 भादंवि मध्ये कोर्ट उठे पर्यंत शिक्षा व 5,00/–रु. दंड व दंड न भरल्यास प्रत्येकी 15 दिवसाचा साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. आनंद ठाकरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि शुभांगी वाजे, तर कर्मचारी सहा.फौज. श्री. तराळे, श्री. मिश्रा, श्री. सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी, पोशि हुड यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर